दिन विशेष...

१२८८ : ज्ञानेश्वर महाराजांनी पैठण येथे रेड्याकडून वेद म्हणवून घेतले.
१८६७ : प्रोफेसर वेल्स यांनी मुंबईत बलूनचे यशस्वी उड्डाण केले.
१८८० : क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.
१९२२ : प्रिन्स ऑफ वेल्थ हे संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,१८०.९६ -७८०.१८ (०.९२%)
डॉलर ₹ ८९.९०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १२ |
| दिल्ली | १७ | ०६ |
| मुंबई | ३३ | १६ |
| नागपूर | २७ | ११ |
| पुणे | २९ | ०७ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६१ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार

मनात शांतता असेल, तर बाहेरची वादळं काहीच करू शकत नाहीत.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:०३

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३९,४६०/- २,५२,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# जळगावमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा 'रोड शो' अचानक रद्द

## पालकमंत्री गुलाबराव पाटलांनी महायुतीच्या नेत्यांसह नियोजित रोड शोला केली सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात महायुतीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'रोड शो' गुरूवारी आयोजित केला होता. त्यादृष्टीने शिवसेना शिंदे गटाकडून आवश्यक सर्व जय्यत तयारी करण्यात आली होती. मात्र, असे अचानक काय घडले कुणास ठाऊक उपमुख्यमंत्री शिंदे रोड शोमध्ये सहभागी होऊ शकले नाही.**





जळगाव शहरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यासाठी मोठ्याप्रमाणावर जय्यत तयारी करण्यात आली होती. महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रोड शोसाठी शहरातील प्रमुख रस्त्यांवर ठिकठिकाणी आकर्षक स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. बॅनर्स, झेंडे, फलक लावून संपूर्ण मार्ग भगवेमय करण्यात आला होता. कार्यकर्ते आणि



पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह संचारलेला दिसून येत होता. मात्र, ऐनवेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा रद्द झाल्याची माहिती समजताच काही प्रमाणात कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली. तरीही शिवसेनेने प्रचारात कोणताही खंड पडू दिला नाही. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अनुपस्थितीत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी महायुतीच्या अन्य नेत्यांसह, पदाधिकाऱ्यांना सोबत घेत नियोजित रोड शोला सुरुवात केली. ठरलेल्या वेळेनुसार रोड शोच्या माध्यमातून जळगाव शहरातील विविध मार्गावरून प्रचार रॅली काढण्यात आली. कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी रॅलीचे स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

रोड शो दरम्यान पालकमंत्री पाटील यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून जळगाव शहरात राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले जात आहेत. पायाभूत सुविधा, रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर कामे करण्यात आली असून जळगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.यावेळी गुलाबराव पाटील यांनी महायुतीचे सरकार हे स्थिर आणि विकासाभिमुख सरकार आहे. या सरकारच्या कामकाजावर विश्वास ठेवून मतदारांनी पुन्हा एकदा संधी द्यावी, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जळगाव दौरा पुढील काही दिवसांत नव्याने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाच्या सूत्रांकडून देण्यात आली. यावेळी दौरा रद्द झाला असला तरी शिवसेनेच्या प्रचारात कोणतीही शिथिलता येणार नाही. महायुतीच्या नेत्यांकडून जोमाने प्रचार सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

### ➤ 'रोड शोमध्ये यांची होती उपस्थिती

या 'रोड शो'मध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत सोनवणे, भाजपाचे आमदार राजूमामा भोळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यासह महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, स्थानिक नेते आणि उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे नसतानाही प्रचारात कोणतीही कमतरता भासणार नाही, असा संदेश यावेळी शिवसेनेकडून देण्यात आला. दरम्यान, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. नेतृत्व कोणतेही असो, महायुतीचा विजय निश्चित करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने ताकदीने मैदानात उतरावे, असे त्यांनी नमूद केले.

## थोडक्यात

### रोहित शर्माच्या पत्नीने मुंबईत खरेदी केलं आलिशान घर

**मुंबई ।** रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेह हिने मुंबईत नवं घर खरेदी केल्याचं समोर आलं आहे. ज्याची रोहितच्या आयपीएल सॅलरीपेक्षा पण जास्त आहे. रितिका सजदेहने तब्बल २६.३० कोटी रुपयांना आलिशान घर खरेदी केलं आहे. या अपार्टमेंटचा कार्पेट एरिया २,७६०.४० चौरस फूट आहे आणि त्यात तीन कार पार्किंग स्पेस आहेत. या व्यवहारासाठी १.३१ कोटी स्टॅम्प ड्युटी आणि ३० हजार रुपये रजिस्ट्रेशन चार्ज आकारले गेले. तर १२ डिसेंबर २०२५ रोजी रितिकाने हे घर रजिस्टर केलं होतं.

### ऋतुराज गायकवाडने मोडला वर्ल्ड रेकॉर्ड

**मुंबई ।** भारताचा स्टार फलंदाज ऋतुराज गायकवाडने लिस्ट ए क्रिकेटमध्ये आपल्या कामगिरीच्या जोरावर दबदबा कायम ठेवला आहे. वादळी खेळी, शतकांच्या जोरावर त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. यादरम्यान त्याने एक असा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो जगात आजवर कोणालाच जमला नव्हता. ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू माईकल बेवन, दिग्गज विराट कोहली सारख्या मोठ्या फलंदाजांना मागे टाकत वर्ल्ड रेकॉर्ड नावे केला.

# ईपीएफओची भव्य योजना, कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये ५ पट वाढ होणार?

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर येत आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना अर्थात ईपीएफओ लवकरच खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या किमान मासिक पेन्शनवर मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे.**




वाढती महागाई आणि जीवनमानाचा वाढलेला खर्च लक्षात घेता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अधिक चांगली आर्थिक सुरक्षा मिळावी यासाठी सध्याची १ हजार रुपयांची किमान पेन्शन वाढवून ती ५ हजार रुपये करण्यावर गांभीर्याने विचार सुरू आहे. या प्रस्तावाला विविध कर्मचारी संघटना आणि पेन्शनधारकांनी मोठा पाठिंबा दर्शविला असून, या निर्णयामुळे निवृत्त व्यक्तींचे जीवन अधिक सुसह्य होण्यास मदत होणार आहे.


सध्या ईपीएफओच्या कर्मचारी पेन्शन योजना १९९५ अंतर्गत पात्र निवृत्त व्यक्तींना दरमहा किमान १,००० रुपये पेन्शन मिळते, जी गेल्या अनेक वर्षांपासून स्थिर आहे. मात्र, ही अत्यल्प रक्कम दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी नसल्याचा सूर कामगार वर्गातून उमटत होता. या पार्श्वभूमीवर सरकार किमान पेन्शनमध्ये थेट पाच पट वाढ करण्याच्या तयारीत आहे. या संभाव्य निर्णयाचा मोठा फायदा ईपीएफओमध्ये नोंदणीकृत असलेल्या खासगी कर्मचाऱ्यांना, ईपीएस सेवा पात्रता पूर्ण करणाऱ्या निवृत्तांना आणि सध्या किमान (पान २ वर)

# अर्ज बाद झालेल्या उमेदवारांना मिळणार दिलासा

## उच्च न्यायालयात आज होणार तातडीची सुनावणी

वृत्तसंस्था । मुंबई

**पुढील आठवड्यात होणारी मुंबई महापालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक उमेदवारांसाठी एक आशेचा किरण निर्माण झाला आहे. विविध कारणास्तव फेटाळण्यात आलेल्या या उमेदवारांचे अर्ज पुन्हा दाखल करून घेण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका करण्यात आली आहे. विशेष म्हणजे याचिकेतील मागण्या आणि याचिकेवर तातडीच्या सुनावणीची गरज लक्षात घेऊन न्यायालयानेही या याचिकेवर शुक्रवारी तातडीची सुनावणी ठेवली आहे.**



**मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही याचिका सादर करण्यात आली तेव्हा न्यायालयाने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली व प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले. प्रतिज्ञापत्रे किंवा प्रश्न-उत्तर पत्रके योग्य स्वरूपात नसल्याच्या अथवा कायदेशीररीत्या आवश्यक नसलेली पोलीस, पाणी, कर, मलनिस्सारण आणि मालमत्ता यासह पाच विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) सादर करण्यात अयशस्वी झाल्याच्या कारणास्तव बहुतांश उमेदवारांचे अर्ज फेटाळण्यात आले.**

विभाग क्रमांक १ ते २२७ चे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या महापालिका आयुक्तांनी या उमेदवारांचे अर्ज विविध कारणांस्तव फेटाळले होते. तथापि, सत्ताधारी पक्षाला खूश करण्यासाठी हे अर्ज फेटाळले असावेत, असा संशय याचिकाकर्त्यांनी याचिकेत उपस्थित केला आहे. त्याचप्रमाणे, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दिलेली सात दिवसांची मुदत अत्यंत कमी असल्याचा दावा देखील केला आहे. पाणी, मालमत्ता कर आणि बांधकाम प्रस्ताव यासारखे विभाग महानगरपालिकेच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी मनमानी, अवाजवी आणि घटनेच्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. विरोधी पक्षांच्या उमेदवारांना ना-हरकत प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब करून राजकीय कटकारस्थान होण्याची दाट शक्यताही याचिकेत वर्तवण्यात आली.

# अंबरनाथमधील १२ नगरसेवकांवर काँग्रेस करणार कारवाई

## काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांची माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये केलेला प्रवेश हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. या सर्व नगरसेवकांचे नगरपालिका सदस्यत्व रद्द करण्यासाठी काँग्रेस पक्ष कायदेशीर कारवाई करणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी दिली.**



अंबरनाथ नगरपालिकेची निवडणुकीत भाजपचा नगराध्यक्ष निवडून आला. मात्र नगरपालिकेत बहुमत नसल्याने भाजपने सत्तेसाठी काँग्रेस नगरसेवकांना सोबत घेऊन स्वतंत्र गट स्थापन केला. या नगरसेवकांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना कोणतीही माहिती न देता, पक्षाला अंधारात ठेवून भाजपशी युती करण्याच्या स्थानिक नेतृत्वाच्या कृतीची गंभीर दखल घेत काँग्रेसने बुधवारी या १२ नगरसेवकांना पक्षातून निलंबित केले. पक्षाच्या कारवाईनंतर या नगरसेवकांनी आज नवी मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशानंतर काँग्रेसने १२ नगरसेवकांच्या विरोधात कायदेशीर लढाई लढण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. स्वतंत्र गट स्थापन करणे किंवा नंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे हे अनैतिक तर आहेच पण असंविधानिकही (पान २ वर)

# ट्रम्प भारतावर लादणार ५०० टक्के टॅरिफ?

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यापासून सातत्याने भारतासह जगाची चिंता वाढवणारे निर्णय घेत आहेत. सध्या अमेरिकेत आयात होणाऱ्या भारतीय मालावर ५० टक्के आयातशुल्क (टॅरिफ) आकारले जात आहे. पण, आता हे शुल्क वाढवून ५०० डॉलर्स केले जाणार असल्याचा इशारा अमेरिकेने दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी द्विपक्षीय ङ्गरशिया सँक्शन्स बिलफ्ला (रशियावरील निर्बंधांचे विधेयक) पाठींबा दिल्यानंतर हे शुल्क आकारले जाण्याची शक्यता आहे.रशियावर ५०० टक्के टॅरिफ लादल्याने अमेरिकेत आयात होणाऱ्या रशियन मालावर ५०० टक्के आयातशुल्क आकारले जाईल, त्यामुळे रशियाला आर्थिक फटका बसून रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यास मदत मिळेल, असे अमेरिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी म्हटले आहे.

# नाशिकमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या हृदयासह जटिल शस्त्रक्रिया १००% केल्या पूर्ण

वृत्तसंस्था । नाशिक

**नाशिक राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम या उपक्रमात अंगणवाडी आणि शालेय वयोगटातील १८ वर्षांपर्यंतच्या मुलांची मोफत आरोग्य तपासणी, वेळीच निदान, उपचार व आवश्यक शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. यामध्ये मुलांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या.**

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमतंर्गत मुलांमधील जन्मदोष, आजार, पोषण व इतर कमतरता तसेच विकासात्मक विलंब व अपंगत्व यांचे वेळीच निदान करून मोफत उपचार उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. जन्म दोष मध्ये न्यूरल ट्यूब डिफेक्ट, डाउन सिंड्रोम, क्लेफ्ट लिप आणि पॅलेट, टॅलिपेस, हिप डिस्प्लेसिया, कंजेनिटल हार्ट डिसीज, कंजेनिटल कॅटारॅक्ट यासह थॅलॅसेमिया, सिकलसेल, ॲनिमिया, कंजेनिटल हायपोथायरॉईडीझम, गौट, त्वचेचे आजार, कानाचा संसर्ग आदी आजारांची तपासणी करण्यात आली. हे सर्व दोष आणि आजार मुलांच्या वाढीवर परिणाम करू शकतात, म्हणून वेळीच तपासणी महत्वाची आहे. ओठ आणि तोंडाची शस्त्रक्रिया, क्लब फूट असलेल्या मुलांवर: पॉनसेटी पद्धतीने शस्त्रक्रिया किंवा कास्टिंग. कंजेनिटल हार्ट डिसीज असलेल्या मुलांवर ओपन हार्ट सर्जरी किंवा व्हॉल्व्ह रिपेअर, बधिरपणा असलेल्या मुलांवर कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

### ➤ अंगणवाडी केंद्र, सरकारी व अनुदानित शाळांमध्ये


फिरत्या आरोग्य पथकाव्दारे तपासणी केली जाते. प्रत्येक पथकात दोन आयुष डॉक्टर, एक परिचारिका आणि एक फार्मासिस्ट यांचा समावेश असतो. निदान झालेल्या मुलांना पुढील उपचारांसाठी जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्र आणि तृतीय स्तरावरील रुग्णालयांमध्ये मोफत शस्त्रक्रियेसाठी संदर्भित केले जाते. नाशिक जिल्ह्यात ८० फिरती पथके कार्यरत असून जिल्हा रुग्णालय आणि डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय येथे प्राथमिक उपचार दिले जातात. जटिल शस्त्रक्रियांसाठी कोकिळाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, फोर्टिस हॉस्पिटल तसेच इतर एम्पॅनेल्ड सुपर स्पेशॅलिटी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार केले जात आहेत.

# वेदांता समूहावर शोककळा! अनिल अग्रवाल यांना पुत्रशोक

### आता ३६६०००००००००० रुपयांच्या उद्योगाचा वारसदार कोण?

वृत्तसंस्था । न्यूयॉर्क

**वेदांता ग्रुपचे अध्यक्ष आणि अब्जाधीश उद्योगपती अनिल अग्रवाल पुत्रशोकात बुडाले आहे. अग्रवाल कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला आणि त्यांचा एकुलता एक मुलगा अग्निवेश अग्रवाल यांचे वयाच्या ४९ व्या वर्षी निधन झाले.**



वडिलांचा सर्वात मोठा आधार असलेल्या मुलाला आता स्वतः वडिलांना उतार वयात खांदा द्यायची वेळ आली आहे. अग्निवेश अग्रवाल यांच्या निधनाने केवळ कुटुंबच शोकात बुडाले नाही तर देश आणि जगाचे लक्ष वेदांत साम्राज्याच्या भविष्यावर लागले आहेत. परिणामी, लोक अनिल अग्रवाल यांच्या कुटुंब, मुलं आणि सुनेबद्दल जाणून घेण्यास उत्सुक आहेत. प्रत्येकाच्या मनात सर्वात मोठा प्रश्न असा आहे की: त्यांच्या मुलाच्या मृत्यूनंतर अब्जावधी रुपयांच्या या प्रचंड व्यवसायाची जबाबदारी कोण स्वीकारेल?

## संपादकीय

### जागतिक क्षमता केंद्राचे नवे हब

महाराष्ट्रातील उद्योग विभागाचे नाव बदलून आता उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग असे करण्यात आले असून, तसा शासननिर्णय काढण्यात आला आहे. गुंतवणुकीसाठी इन्व्हेस्ट महाराष्ट्र ही कंपनी तयार करण्यात आली असून, त्यासाठी ३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. नव्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी १ लाख १८ हजार २७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र हे देशात उद्योगधंद्यात आघाडीवरील राज्य असून, विदेशी गुंतवणुकीत आपण गुजरातला देखील मागे टाकले आहे. राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १३.६% चा आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत उद्योगाचा वाटा २५ टक्क्यांचा आहे. देशात येणार्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक राज्यात होते. त्यामुळे विकासाचा वेग आणखी पुढे न्यायचा असेल, तर उद्योग, सेवा आणि गुंतवणूक यांचा समग्रतेने विचार केला पाहिजे. मात्र महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढायचे असतील, तर प्रथम कायदा आणि सुव्यवस्था यांची परिस्थिती सुधारली पाहिजे व उद्योजकांकडून गावगुंड जी खंडणी घेतात, ते प्रकार थांबले पाहिजेत. उद्योजकांना सतावणाऱ्या राजकीय गुंडगिरीचा बंदोबस्त झालाच पाहिजे. राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात, म्हणजेच जीडीपीमध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा सध्या २४% आहे. आणखी दहा वर्षांत तो २७ टक्क्यांपर्यंत आणि २०४७ पर्यंत ३०% पर्यंत जावा, असे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. दिवसेंदिवस शेती ही आतबट्ट्याची ठरत असून, त्यामुळे शेतकर्यांना शेतीकडून उद्योगांकडे वळवणे भागच आहे. महाराष्ट्रात सव्वातीन लाख किलोमीटरचे रस्ते आणि सहा हजार किलोमीटरवर रेल्वेचे जाळे आहे. समृद्धी महामार्गाच्या कडेकडेने विकास व्हावा, असे नियोजन आहे. त्यासाठी नवीन आठ टाउनशिप प्रकल्प या महामार्गाच्या आजूबाजूला उभारले जाणार आहेत. मुंबई आणि जेएनपीटीवरून होणारी मालवाहतूक एकूण वाहतुकीच्या ५३% एवढी आहे. वाढवण बंदर झाल्यानंतर मालवाहतूक आणखी वाढणार असून, तिचा वेगही वाढेल. महाराष्ट्र सरकार गुंतवणूक आकर्षित करून घेण्यासाठी नवी दिल्ली, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद येथे कंट्री डेस्क स्थापन करणार आहे. अशी डेस्क अमेरिका, स्वीडन, जर्मनी, तैवान, ऑस्ट्रेलिया, जपान येथेही स्थापन केली जातील. मात्र हे आश्वासन देण्यात आले असले, तरी ते प्रत्यक्षात केव्हा येईल, हे पाहावे लागेल! कारण मोठमोठ्या घोषणा होतात, परंतु प्रत्यक्षात त्या प्रमाणात गुंतवणूक आणि उद्योग आकर्षित होऊन, विकासप्रक्रिया गतिमान होत असल्याचे दिसत नाही. आता पुण्याजवळील पुरंदर येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी आवश्यक असलेल्या ६ हजार कोटी रुपयांचा निधी कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे. त्यासाठी हुडको या संस्थेकडून अर्थसाह्य घेतले जाणार असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांतील ३ हजार एकर जागेचे संपादन करण्यात येणार आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी नियोजित पुरंदर विमानतळ हा नक्कीच उपयुक्त ठरणार आहे.

# बॅलेट युनिटवर उमेदवारांच्या नावाची चिठ्ठी लावून मतदान यंत्र केले सील

● स्ट्राँग रूमही केले सील; मुख्य निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत पार पडली प्रक्रिया

प्रतिनिधी । जळगाव



**महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेला वेग आला असून बुधवारी (दि.७) मुख्य निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत व कडेकोट पोलीस बंदोबस्तात बॅलेट युनिटवर उमेदवारांच्या नावांची चिठ्ठी लावून त्या मतदान यंत्रांची सेटिंग करून सील करण्यात आली. त्यानंतर सर्व यंत्र स्ट्राँग रूममध्ये ठेवून स्ट्राँग रूमला सिलिंग करण्यात आले.**

महानगरपालिकेसाठी गुरुवार, दि.१५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यासाठी महापालिका प्रशासन सज्ज झाले असून बुधवारी (दि.७) सकाळी ८ वाजता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील गोडाऊन क्रमांक १४ व १७ मध्ये मुख्य निवडणूक निरीक्षक प्रकाश खपले, निवडणूक निरीक्षक सुभाष बोरकर, मनपाचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या उपस्थितीत प्रत्येक बॅलेट युनिटवर उमेदवारांच्या नावांची चिठ्ठी लावून मतदान यंत्रांची सेटिंग करून सिलिंग करण्यात आले. त्यानंतर स्ट्राँग रूममध्ये ती मतदान यंत्रे ठेवण्यात येऊन स्ट्राँग रूमला सील करण्यात आले.

■ **पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्हीची नजर**

सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस प्रशासन व निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत व कडेकोट पोलीस बंदोबस्तात ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली. मतमोजणीच्या दिवसापर्यंत स्ट्राँग रूमसह परिसरात पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्हीची नजर राहणार असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले.

## जळगावात नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई

प्रतिनिधी । जळगाव



**शहरातील शनिपेठ आणि रिधूरवाडा भागात प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या दोघांवर शनिपेठ पोलिसांनी बुधवारी (दि.७) कारवाई केली. या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून २० हजारांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला आहे.**

मकर संक्रांती सणाच्या पार्श्वभुमीवर दरवर्षी डिसेंबर व जानेवारी महिन्यात पतंग उडविण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे मांजाची मागणी वाढत असल्याने या मागणीचा फायदा घेवून काही विक्रेत्यांकडून प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री केली जाते. दरम्यान, शहरातील शनिपेठेतील ओक मंगल कार्यालयाच्या मागील बाजूस तसेच रिधूरवाडा भागात प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री केली जात असल्याची माहिती शनिपेठ पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकून रितांशू नरेंद्र चौधरी (रा. ओक मंगल कार्यालयाच्यामागे, शनिपेठ) व आलोक ज्ञानेश्वर भौसले (रा.रिधूरवाडा) यांच्यावर कारवाई केली. या कारवाईत चौधरी याच्याकडून १२ हजाराचा तर भोसले याच्याकडून ८ हजार असा २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोघांविरोधात शनिपेठ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वैष्णवी पार्ककरांना रस्त्यांची प्रतिक्षा

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील वैष्णवी पार्क, आहुजानगर, उत्तम नगर आदी भागात गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते नसल्याने या भागातील नागरिकांना रस्त्यांची प्रतिक्षा लागली आहे. त्या भागातही लवकरात लवकर रस्ते करण्यात यावे, अशी अपेक्षा रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

शहरातील विविध भागात रस्त्यांची कामे झाली आहेत. यात अनेक नवीन कॉलन्यांचा देखील समावेश आहे. मात्र, वैष्णवी पार्क, आहुजानगर, उत्तमनगर या १५ वर्षांपेक्षा जुन्या भागात अद्याप रस्त्यांची कामे करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या भागात देखील रस्ते करावेत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

## मनपा निवडणुकीत बंडखोरी करणाऱ्या भाजपाच्या २७ पदाधिकारी, कार्यकर्त्यांची हकालपट्टी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील महानगरपालिका निवडणूकीत बंडखोरी करणाऱ्या भारतीय जनता पक्षातील २७ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांच्यावर पक्षशिस्तीचे उल्लंघन केल्याच्या आरोप करण्यात आला आहे.**

संबंधित पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपचे प्राथमिक सदस्य असताना पक्षाचे धोरण, आदेश व निर्णयांचे पालन करणे अपेक्षित होते. मात्र त्यांच्या कार्यपद्धतीमुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत असल्याचे पक्षाच्या निदर्शनास आले. याबाबत पक्षाच्या अधिकृत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पक्षहित व संघटनात्मक शिस्त लक्षात घेता संबंधित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे प्राथमिक सदस्यत्व तसेच त्यांनी सध्या भूषवलेली सर्व पदे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात हकालपट्टी करण्यात आलेल्या यादीत संगीता गोकुळ पाटील, हर्षदा अमोल सांगोरे, धनश्री गणेश बाविस्कर, गणेश दत्तात्रय बाविस्कर, रंजना भरत सपकाळे, कांचन विकास सोनवणे, प्रमोद शांताराम शिंपी, भरत शंकर सपकाळे, हिरकणी जितेंद्र बागरे, चेतना किशोर चौधरी, मयुर श्रावण बारी, तृप्ती पांडुरंग पाटील, सुनील ज्ञानेश्वर पाटील, विकास प्रल्हाद पाटील, गिरीष कैलास भोळे, कैलास बुधा पाटील, हेमंत सुभाष भंगाळे, जितेंद्र भगवान मराठे, प्रिया विनय केसवानी, रुपाली स्वप्नील चौधरी, अंजू योगेश निंबाळकर, मयुरी जितेंद्र चौथे, जयश्री गजानन वंजारी, ज्योती विठ्ठल पाटील, उज्वला संजय घुगे, दिनेश मधुकर ढाकणे, कोळीळा प्रमोद मोरे या २७ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

## राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत कार्तिकी भोसलेला कांस्यपदक

● ९ मिनीटात पार केले ५ किमी अंतर



प्रतिनिधी । जळगाव


अहिल्यानगर येथे ३० डिसेंबर ते १ जानेवारीदरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय रोड-रेस सायकलिंग स्पर्धेत ब.गो. शानभाग विद्यालयाची खेळाडू कार्तिकी भोसले हिने कास्य पदक प्राप्त केले.

कार्तिकीने १४ वर्षाखालील मुलींच्या वयोगटात मास स्टार्ट या क्रीडा प्रकारात ५ कि.मी. अंतर केवळ ९ मिनिट ५७ सेकंदात पूर्ण करुन तृत्तीय क्रमांक पटकावला. कार्तिकीला प्रशिक्षक सागर सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अजिंठा लेणीच्या सानिध्यात आजपासून रंगणार 'अजिंठा कला महोत्सव'

प्रतिनिधी । जळगाव

### तीन दिवस होणार विविध कलांचे सादरीकरण



**कला आणि संस्कृतीचा वारसा जतन करणाऱ्या अजिंठा आर्ट सोसायटीतर्फे जागतिक कीर्तीच्या अजिंठा लेणीच्या परिसरात मअजिंठा कला महोत्सवाफ्चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दि. ९ ते ११ जानेवारी या कालावधीत हा महोत्सव पार पडणार असून, चित्र, संगीत, शिल्प आणि नृत्य अशा विविध कलांचा त्रिवेणी संगम रसिक प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.**

महोत्सवाचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, ९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांच्याहस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिंठा आर्ट सोसायटीचे अध्यक्ष संजय गरुड भूषविणार आहेत. याप्रसंगी दीपप्रज्वलनासाठी शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूरचे माजी प्रभारी अधिष्ठाता भरत गढरी उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमाला जळगाव आणि जामनेर परिसरातील अनेक मान्यवर, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मप्रमुख अतिथीफ म्हणून उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवणार आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन आणि सादरीकरण होणार आहे. अजिंठा लेणीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर होणारा हा महोत्सव पर्यटकांच्या आणि कलाप्रेमींच्या आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. अजिंठा लेणी, फर्दापूर येथे सकाळी ११ वाजेपासून या महोत्सवाचा लाभ जास्तीत जास्त कलाप्रेमींनी घ्यावा, असे आवाहन अजिंठा आर्ट सोसायटीचे सचिव शिवप्रसाद जोशी व आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### ईपीएफओची भव्य योजना......

पेन्शन घेत असलेल्या लाभार्थ्यांना होणार आहे. विशेषत: ज्यांच्याकडे उत्पन्नाचे दुसरे साधन नाही, अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी ही वाढ मोठा आधार ठरेल. या प्रस्तावावर अद्याप अधिकृत शिक्कामोर्तब झालेले नसले तरी, आगामी केंद्रीय अर्थसंकल्पात किंवा महत्त्वाच्या धोरणात्मक बैठकीत याची घोषणा होऊ शकते असे संकेत मिळत आहेत. पेन्शन वाढीसोबतच ईपीएफओ प्रशासन डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून पीएफ काढण्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि पेन्शन वितरणाचा वेग वाढवणे अशा इतर सुधारणांवरही काम करत आहे. मात्र, ही बाब सध्या विचाराधीन असल्याने कर्मचाऱ्यांनी केवळ अधिकृत सरकारी अधिसूचनांवरच विश्वास ठेवावा आणि आपल्या सेवा नोंदी अचूक ठेवाव्यात, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

### अंबरनाथमधील १२ नगरसेवकांवर......

आहे. त्यामुळे यासंदर्भात लवकरच सर्वांना कायदेशीर नोटीसा बजावण्यात येतील, असे सचिन सावंत यांनी सांगितले.

भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नगरसेवकांमध्ये प्रदीप नाना पाटील, दर्शना उमेश पाटील, अर्चना चरण पाटील, हर्षदा पंकज पाटील, तेजस्विनी मिलिंद पाटील, विपुल प्रदीप पाटील, मनीष म्हात्रे, धनलक्ष्मी जयशंकर, संजवणी राहुल देवडे, दिनेश गायकवाड, किरण बद्रीनाथ राठोड आणि कबीर नरेश गायकवाड यांचा समावेश आहे.

## प्रभाग ८ मध्ये राबवला 'कॉफी विथ युथ' कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय जनता युवा मोर्चा, जळगाव महानगरतर्फे प्रभाग क्रमांक ८ मध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ 'कॉफी विथ युथ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमास नवनिर्वाचित नगरसेवक विशाल भोळे, प्रभाग क्रमांक ८ चे उमेदवार अमर जैन, नरेंद्र पाटील, कविता पाटील, मानसी भोईटे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव अमित सोळुंके, प्रभारी रोहित सोनवणे, उपाध्यक्ष भरत कर्डिले, सतनामसिंह बावरी, चिटणीस अनुराज मराठे, युवा मोर्चा मंडल क्र ५ चे अध्यक्ष गौरव राजपूत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

प्रदेश उपाध्यक्षा भैरवी वाघ-पलांडे, जिल्हाध्यक्ष महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमादरम्यान युवक व नागरिकांशी थेट संवाद साधत महायुतीच्या विकासात्मक धोरणांबाबत, प्रभागातील समस्या व भविष्यातील विकास आराखड्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी परिसरातील नागरिक व युवक उपस्थित होते.

## मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिरातून २५ रुग्णांना मिळाले नवजीवन

● अमेरिकेतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने केल्या शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । जळगाव

**स्व.उत्तमचंद पारख आणि स्व.जोहरीमल श्रीश्रीमाल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भारतीय जैन संघटना आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात अमेरिकेतील प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन डॉ. लरी वाईनस्टाईन आणि त्यांच्या टीमने १०० हून अधिक रुग्णांची तपासणी करून यातील २५ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केली.**



शिबिरात दुभंगलेले ओठ व टाळू, नाक व कानाच्या बाह्य विकृती, भाजलेल्या जखमांमुळे आकुंचन पावलेली त्वचा, चिकटलेली बोटे, फुगलेले गाल तसेच चेहऱ्यावरील इजा व डाग यांसारख्या समस्यांवर उपचार करण्यात आले. अनेक रुग्णांना जन्मापासून किंवा अपघातानंतर विद्रूप चेहऱ्यामुळे समाजात वावरताना त्रास सहन करावा लागत होता. लाखो रुपयांचा खर्च येणाऱ्या या शस्त्रक्रिया या शिबिरात पूर्णपणे मोफत करण्यात आल्याने शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या रुग्णांना आत्मविश्वासाने जगण्याची नवी संधी मिळाली आहे.

■ **गावोगावी जाऊन पोहोचवली शिबिराची माहिती...**

भारतीय जैन संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विनय पारख आणि सदस्य अशोक श्रीश्रीमाल यांनी या शिबिराचे नियोजन केले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावोगावी जाऊन गरजू रुग्णांपर्यंत या शिबिराची माहिती पोहोचवली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ.गिरीश ठाकूर, डॉ.मारुती पोटे, डॉ.रोहन पाटील, डॉ.भूषण महाजन, डॉ.आदित्य बिहाणी यांच्यासह टीमने तसेच कांतीलाल कटारिया, पंकज जैन, सुमित मुनोत, कल्पना नाहाटा, सुहानी सुराणा, नितीन चौबे, सुनील बाविस्कर, प्रशांती पुराणिक, गिरीश कोळी आदींनी सहकार्य केले.

## नागरिकांनी निर्भयपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे!

● जिल्हाधिकारी घुगे यांचे आवाहन; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पार पडली बैठक

प्रतिनिधी । जळगाव




**लोकशाही प्रक्रियेची सुव्यवस्था व विश्वासार्हता कायम राखण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून नागरिकांनी कोणत्याही दबावाविना निर्भयपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.**

जळगाव महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

बैठकीला पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना मोरे, उपविभागीय अधिकारी विनय गोसावी आदी अधिकारी उपस्थित होते.

जळगाव महानगरपालिकेसाठी गुरूवार, दि.१५ रोजी मतदान तर शुक्रवार, दि.१६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा व जळगाव शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था, शांतता व सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीदरम्यान, निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, मतदान व मतमोजणी प्रक्रियेदरम्यान आवश्यक सुरक्षा व्यवस्था, विविध यंत्रणांमधील समन्वय तसेच तत्काळ प्रतिसाद यंत्रणा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संबंधित विभाग प्रमुखांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

## विद्यापीठात आज राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्यावतीने शुक्रवार दि.९ रोजी पी.एम.उषा कार्यक्रमांतर्गत 'साहित्यातील मानवतावाद' या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन अधिसभा सभागृहात करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यकार डॉ. जयप्रकाश कर्दम यांच्याहस्ते होणार असून ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव यांचे बीजभाषण तर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार आहेत. यावेळी प्रा.म.सु. पगारे उपस्थित राहतील.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार कारवाई करा

## मनपा क्षेत्रातील सर्व विभाग प्रमुखांना मुख्य निवडणूक निरीक्षक पवार यांचे निर्देश

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक निरीक्षक ओमकार पवार व निवडणूक निरीक्षक अतिरीक्त जिल्हाधिकारी देवदत्त केकान यांच्या प्रमुख उपस्थितीत मनपा क्षेत्रातील सर्व विभाग प्रमुखांची एकत्रित बैठक गुरूवार, दि.८ रोजी पार पडली. बैठकीत, आचारसंहिता कक्षाकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर सर्व विभागांनी समन्वयाने कारवाई करावी, असे निर्देश मुख्य निवडणूक निरीक्षक ओमकार पवार यांनी दिले.**



बैठकीला आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस, जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे उपस्थित होते. बैठकीत राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व विभागांनी समन्वयाने काटेकोर अंमलबजावणी व पालन करावे असे बैठकीच्या प्रारंभी निवडणूक निरीक्षकांनी सूचीत केले. तसेच विविध विभागांमार्फत आजतागायत झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार मुख्य निवडणूक निरीक्षक ओमकार पवार व निवडणूक निरीक्षक यांनी, प्रामुख्याने विना परवाना बॅनर, पोस्टरवर शहर विद्रुपीकरण कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे, आचारसंहिता कक्षाकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यवाही करुन गुन्हे दाखल करणे, एसएसटी पथकाअंतर्गत प्रभावी कार्यवाही करणे तसेच सर्व वाहनांची तपासणी करणे, मतदान केंद्रांवरील गोपनियता, तेथील सुविधा व करावयाच्या उपाययोजना या विषयी काटेकोरपणे दक्षता घेण्याच्या सुचना दिल्या.

प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी माहिती फलक लावणे, अग्रणी बँक, आयकर विभाग व पोलिस विभागाच्या समन्वयाने रोख रक्कम वाहतूक व हवाला व्यवहारांवर लक्ष ठेवणे, शस्त्र जमा करणे बाबत कार्यवाही, संवेदनशिल मतदान केंद्रांवर अतिरिक्त सुरक्षा व वेबकास्टींग, सिसिटीव्ही यंत्रणा उभारणे, दारुबंदीचे दिवस जाहिर करणे आचारसंहिता कक्षा मार्फत प्रभावी व कडक अंमलबजावणी व कार्यवाही सुरु करणे, दुबार मतदारांबाबत काटेकोर कार्यवाही करणे, पतपेढी, सहकारी बँक यांच्या व्यवहारांवर देखरेख ठेऊन संबंधितांकडून दैनंदिन अहवाल घेणे, स्ट्राँग रुम, मतमोजणी कक्षाची सुरक्षा व्यवस्था बळकट करणे आदी विविध मुद्यांवर चर्चा करुन निवडणूक प्रक्रिया अत्यंत पारदर्शी व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्यवाही करावी असे बैठकीत आदेशित करण्यात आले.

# पुरमेपाड्याच्या पाण्यामुळे शेकडो एकर क्षेत्र ओलिताखाली येणार

## माजी जि.प.अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी व्यक्त केला विश्वास

प्रतिनिधी । धुळे

बोरी नदीवरील पुरमेपाडा धरणाच्या पाण्यामुळे शेकडो एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. रब्बीचा हंगाम फुलणार आहे. आ.राम भदाणे यांनी लाभ क्षेत्रातील प्रत्येक गाव, शिवारात पाणी पोहचवण्यासाठी पाट दुरूस्तीला प्राधान्य दिले असल्याची माहिती जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी दिली.

रब्बी हंगामासाठी बोरी नदीवरील पुरमेपाडा धरणातील पाण्याचे पहिले आवर्तन श्री.भदाणे यांच्याहस्ते सोडण्यात आले. याप्रसंगी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, बाळासाहेब देसले, जिल्हा परीषदेचे माजी सदस्य किशोर अल्लोर, जिभाऊ शेणगे, संजू चौधरी, आबा चौधरी, ज्ञानेश्वर खैरनार, राजू सोनवणे, चिमणसिंग राजपूत, चंद्रकांत जाधव, पोपट ठाकरे, संजय अहिरे,



शरद अहिरे, रविंद्र राजपूत, प्रविण ठोके, मुन्ना पवार, आमदार प्रतिनिधी राहुल पाटील आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री.भदाणे यांनी, पूरमेपाडा धरणाच्या लाभक्षेत्रातील पुरमेपाडा, आर्वी, धाडरे, धाडरी, मोघण, हेंद्रण, जुनवणे, बोरकुंड, दोंदवाड, विंचूर व शिरूड शेती शिवारातील शेतीला पाणी मिळणार आहे. या शिवारातील पाटचाऱ्यांची दूरावस्था झालेली होती. आ.भदाणे यांनी पाटबंधारे विभागाला पाटचाऱ्या दुरुस्तीचे निर्देश दिले होते. प्रत्येक भाग ओलिताखाली आला पाहिजे. सिंचनाचे क्षेत्र वाढीसाठी अधिक प्रयत्न सुरु असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

## थोडक्यात

### म्हसदीसह धमणार परिसरात कांदा काढणीला वेग

**शहादा ।** सध्या म्हसदीसह धमणार परिसरात रब्बी हंगामातील पिके काढणीचा वेग वाढला आहे. शिवारात सगळीकडे काढणीची लगबग दिसत असली, तरी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर मात्र चिंतेचे सावट आहे. धमणार रस्त्यावरील शेतकरींच्या शेतात सध्या सकाळच्या सत्रात मजूर कांदा काढणीच्या कामात व्यग्र आहेत. मात्र, कष्टाने पिकवलेल्या या पांढऱ्या सोन्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मोठ्या आशेने पोळ कांद्याची लागवड केली होती. कडाक्याची थंडी, अहोरात्र केलेली मेहनत आणि महागडी खते-औषधे घालून हा कांदा जोपासला. पीक हाती आले पण बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे.

### समता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**नंदुरबार ।** येथील समताविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात एन.एच.एम. अंतर्गत आरबीएसके पथक ग्रामीण रुग्णालय धानोरा यांच्यामार्फत मुख्याध्यापक चंद्रशेखर लोखंडे यांच्या मार्गदर्शनानुसार आरोग्य तपासणी कार्यक्रम झाला. याप्रसंगी प्रा.एस.के.पाटील यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणीचे महत्व सांगितले. डॉ. अविनाश चकोर, डॉ. सोनाली कुलकर्णी, विजय बडगुजर, सरिता पाडवी ग्रामीण रुग्णालय धानोरा यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. याप्रसंगी प्रा.प्रकाश पाटील, प्रा. निलेश कोळपकर, प्रा. धनराज अहिरे, प्रा. वैशाली बाविस्कर, प्रा. प्रज्ञा बोरसे, प्रा. विनिता जगताप, प्रा.बी.बी. गावित, प्रा. इंद्रसिंग वळवी, प्रा. सुजय गिरासे उपस्थित होते.

# मतदान केंद्रांची लोकसभा विधानसभा निहाय पुनर्रचना करा : माजी आ.पाटील

प्रतिनिधी । धुळे

धुळे महानगरपालिका क्षेत्रातील आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जाहीर केलेली मतदान केंद्रे मतदारांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. ही केंद्रे बदलून ती विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांप्रमाणेच ठेवावीत, अशी मागणी माजी आमदार शरद पाटील आणि अनिल मुंदडा यांनी केली आहे.

यासंदर्भात निवडणूक अधिकारी तथा आयुक्त प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना सविस्तर निवेदन देण्यात आले असून, केंद्रांच्या पुनर्रचनेची मागणी लावून धरण्यात आली आहे. प्रभागातील मतदारांची पायपीट थांबवा निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, प्रत्येक मतदाराला त्याच्या घरापासून जवळचे केंद्र मिळणे हा हक्क आहे. मात्र, सध्याच्या प्रभागांच्या रचनेत मतदारांना त्यांच्या घरापासून लांबच्या अंतरावर मतदान केंद्रांचे वाटप करण्यात आले आहे. धुळे शहरातील मागील काही घटना आणि संवेदनशील परिस्थितीचा संदर्भदेत निवेदनात म्हटले आहे की, सध्या केलेले मतदान केंद्रांमधील बदल अयोग्य आहेत, असे शरद पाटील यांनी म्हटले आहे.

## रंधे विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी । बोराडी

किसान विद्याप्रसारक संस्था संचलित डॉ. विजयराव व्ही. रंधे विद्यालयात विजयरंग महोत्सव साजरा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ तुषार रंधे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव निशांत रंधे खजिनदार आशाताई रंधे, विश्वस्त रोहित रंधे, नगरसेवक जगदीश अग्रवाल, डॉ जितेंद्र चित्ते, डॉ निताताई सोनवणे, अमृता महाजन संगिता देवरे, सीमाताई रंधे, सारिका रंधे, हर्षाली रंधे उपस्थित होते.

# मतदानासाठी पगारी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी : कामगार अधिकारी सूर्यवंशी

प्रतिनिधी । धुळे

महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदान क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व मतदार कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित उद्योजक व आस्थापनानी त्यांच्या उद्योगात, आस्थापनेत कार्यरत मतदार कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदानासाठी भरपगार सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी, असे आदेश जिल्हा सरकारी कामगार अधिकारी मधुरा सुर्यवंशी यांनी दिले आहे.

महापालिका निवडणुकीसाठी दि. १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी ही त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी उद्योग, उर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील.

# नायलॉन मांजा विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

## वाहनासह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



प्रतिनिधी । नंदुरबार

**प्रतिबंधित नायलॉनचा मांजा विक्री करण्याच्या उद्देशाने उभ्या असलेल्या एका टेम्पोवर नंदुरबार शहर पोलिसांनी कारवाई करत ताब्यात घेतले. या कारवाईत ६ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी दोघांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शहरातील बाहेरपुरा भागात एक चारचाकी टेम्पो हा प्रतिबंधीत नायलॉन मांजाचे पुठ्ठयांचे खोके ठेवून उभा असल्याची गोपनीय माहिती दि.३ जानेवारी रोजी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी हेमंतकुमार पाटील यांनी डी.बी. पथकास सुचना करुन कारवाईसाठी रवाना केले. त्यानुसार पथकाने बाहेरपुरा भागात टेम्पोचा शोध घेत असतांना त्यांना मालवाहू टेम्पो (क्रमांक एम.एच.४७, ई.१२५२) आढळून आला. यावेळी टेम्पो चालकाची चौकशी केल्यानंतर त्याने हे खोके शहादा येथील काशिनाथ मार्केटमध्ये एक इसम मोटारसायकलवर घेऊन आला व त्याने वाहतुकीचे भाडे देऊन एक मोबाईल क्रमांक देत हे पार्सल नंदुरबार येथे पोहचून देण्यास सांगितले. त्याने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर कॉल करुन माहिती घेतली तेव्हा हा माल नंदुरबार येथील भोई नामक इसमाचा असल्याचे समजले. त्यानंतर पथकाने त्या वाहनातील मुद्देमाल तपासून प्रतिबंधीत नायलॉन मांजाचे एकुण ६० प्लॅस्टीकचे रिल व वाहन असा ६ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी डी.बी. पथकाने एकास ताब्यात घेत त्याच्याविरुध्द नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**आगामी** मकरसंक्रांत पतंगोत्सवात नागरीकांनी प्लॅस्टीक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेला व शासनाने बंदी घातलेला नायलॉन मांजाचा वापर करु नये. तसेच अशाप्रकारे नायलॉन मांजा विक्री व हाताळणी करतांना कोणी आढळून आल्यास त्याबाबत तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला कळवावे, त्यानुसार संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी दिला आहे.

# मानव रुहाणी केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

प्रतिनिधी । शिरपूर

**विश्व मानव रुहाणी केंद्र, नवानगरतर्फे आ.काशिराम पावरा यांच्याहस्ते ३१८ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. पिंपळनेर झोन शाखा, दहिवद शाखा अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला.**



शिरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील व जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या गरीब व गरजू मुला-मुलींना शालेय दप्तर, तीन वहया, रंगपेटी, पटटी, पेन्सील, खोडरबर, शार्पनर, स्केच पेन, रंगीत पेन्सील बॉक्स, कंपास इत्यादी शैक्षणिक साहित्य वाटप आ.पावरा यांच्याहस्ते करण्यात आले. जि. प. प्राथमिक शाळा फत्तेपूर कनगई ता.शिरपूर, जि.प. प्राथमिक शाळा नटवाडे, जि.प. प्राथमिक शाळा कन्हेरीपाडा ता. शिरपूर येथील ३१८ विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याची ना.रामदास आठवलेंकडे मागणी

प्रतिनिधी । धुळे

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे नुकतेच शिंदखेडा दौऱ्यावर होते. यावेळी शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाडीले यांनी त्यांची भेट घेवून शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत माहिती दिली तसेच समस्या सोडविण्याची मागणी केली.



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे नुकतेच शिंदखेडा दौऱ्यावर आले होते. दरम्यान, दौरा आटोपून ते धुळेकडे जात असतांना शिंदखेडा येथील वरपाडे चौफुली येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष शशिकांत वाघ, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाडीले, प्रभाकर जाधव, जिल्हा महासचिव राजु शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिक्षक आघाडीचे धुळे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाडीले यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत ना. आठवले यांना माहिती दिली तसेच विविध समस्या सोडविण्याची मागणी केली. ना. रामदास आठवले यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंगणवाडी सेविका पदभरतीत आर्थिक फसवणूक, अनियमितता झाल्याचा प्रकार

## शेवाडेतील रूपाली माळींचा आरोप; चौकशी न झाल्यास आत्मदहनाचा इशारा

प्रतिनिधी । शिंदखेडा

**तालुक्यातील शेवाडे येथील अंगणवाडी क्रमांक १ मधील सेविका पदभरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक व अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार पत्रकार परिषद घेऊन उघड केला. शासनाच्या नियमानुसार भरती प्रक्रिया न राबवता आर्थिक व्यवहार करून संबंधित महिलेकडून रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.**



शेवाडे येथील रूपाली संजय माळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, अंगणवाडी सेविका पद गेल्या पाच ते सहा वर्षांपासून रिक्त असून या काळात मदतनीस कर्मचाऱ्यांकडूनच कामकाज सुरू होते. दिनांक ११ ऑक्टोबर २०२० रोजी त्या व त्यांचे पती शिंदखेडा येथील एकात्मिक बाल विकास कार्यालयात सीडीपीओ यांची भेट घेण्यासाठी गेले असता, कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी विविध कारणे सांगून भेट टाळल्याचा आरोप केला आहे. यानंतर गावातील कार्यकर्त्यांसह एकात्मिक बाल विकास अधिकारी रवींद्र मराठे यांची भेट घेऊन रिक्त पदावर नियमाप्रमाणे भरती प्रक्रिया राबवण्याची विनंती करण्यात आली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी एका जागेसाठी लाखो रुपये देतात असे वक्तव्य केल्याचा आरोपही पत्रकार परिषदेत करण्यात आला आहे. यानंतर विविध माध्यमांतून दबाव टाकत बोरीस येथील प्रदीप साहेबराव पाटील व विनोद दंगल माळी यांच्या मार्फत ५० हजार रुपये रोख तसेच अमराळे फाटा येथे २० हजार रुपये घेतल्याचा आरोप रूपाली माळी यांनी केला आहे.

कोणताही अधिकृत जावक क्रमांक नसलेली आदेश प्रत न देता त्यांना अंगणवाडीत रुजू करण्यात आले. त्यांनी पाच ते सहा महिने काम केले व त्या काळात नियमित मानधनही मिळाले. मात्र साधारण एक वर्षानंतर कोणतेही लेखी कारण न देता कामावर येऊ नये असे सांगण्यात आले. त्यानंतर पुन्हा शिंदखेडा एकात्मिक बाल विकास कार्यालयात बोलावून आदेशावर जावक क्रमांक टाकण्यासाठी आणखी ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. ही रक्कम भरण्यासाठी घरातील सोनं मोडून पैसे दिल्याचेही त्यांनी सांगितले. तरीसुद्धा आजतागायत त्यांना कायमस्वरूपी सेविका म्हणून रुजू करण्यात आलेले नाही. या संपूर्ण प्रकारामुळे रूपाली संजय माळी व त्यांच्या पतीची आर्थिक, मानसिक व कौटुंबिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून गेल्या पाच वर्षांपासून त्यांची फसवणूक सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

# वाणी समाजाच्या ३५० उपवर वधू-वरांनी दिला परिचय




प्रतिनिधी । धुळे

**महाराष्ट्र वाणी युवा मंच, धुळे, संस्कारवाणी युवक मंडळ नाशिक व समन्वय समिती मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लाडशाखीय वाणी समाज राज्यस्तरीय वधू-वर परिचय संमेलन नुकतेच शहरातील कान्हा रिजन्सी येथे मोठ्या उत्साहात पार पडले. त्यात ३५० उपवर वधू-वरांनी परिचय दिला.**

बदलत्या काळात परिचय मेळावे ही समाजाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन मुख्य अतिथी तथा लाडशाखीय वाणी समाज अध्यक्ष (जळगाव) मेजर नाना वाणी यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे उदघाटन माजीमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मेजर नाना वाणी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून संजय पाखले, भाजपाचे ज्येष्ठ नेते गोपाळराव केले, विशालसागर इंडस्ट्रिजचे चेअरमन विशाल चंद्रकांत केले, राजेंद्र वाणी, सचिन बागड, राजेश कोठावदे, गिरीष मालपुरे प्रा. भूषण सोनजे, प्रमोद चांदसरकर, अशोक पाटकर अशोक बाविस्कर, मिना पाचपुते, अस्मिता पाटकर, गजानन मालपुरे, नितीन केले, सिमा कोठावदे यांची उपस्थिती होती. तर राजेंद्र परशुराम पाचपुते यांनी महाराष्ट्र वाणी युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याने समाज बांधवांकडून कौतुक होत आहे.

## जामनेर तालुक्यात वाढत्या थंडीने केळी पीक धोक्यात

### रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकांसाठी पोषक वातावरण

प्रतिनिधी । जामनेर

**जिल्ह्यातील अनेक भागांत मागील काही दिवसांपासून थंडीचा तडाका तीव्र झाला आहे. या बदलत्या हवामानाचा थेट परिणाम शेती पिकांवर दिसून येत आहे. सध्याचे वातावरण रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकांसाठी पोषक ठरत असले तरी केळी पिकाला मात्र थंडीचा जबर फटका बसल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे.**





जामनेर तालुक्यात सध्या किमान तापमानात मोठी घट झाली असली, तरी हे वातावरण गहू व हरभऱ्यासाठी पोषक ठरत आहे. शेतात ही पिके जोमाने वाढताना दिसत आहेत. केळी पानांचा रंग, फुटवा आणि वाढ समाधानकारक असल्याचे शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे रब्बी हंगामाबाबत शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात आशा निर्माण झाली आहे.

मात्र, याच थंडीचा केळी पिकावर विपरित परिणाम झाला आहे. जामनेर तालुक्यातील केकत निंभोरा, हिवरखेडा, पळासखेडा, नेरी, हिंगणे, गाडेगाव परिसरात केळी बागांमध्ये थंडीचा ताण स्पष्टपणे जाणवत आहे. अतिथंडीमुळे केळी झाडांची उंची वाढ थांबली असून, पाने पिवळसर पडणे, कडा करपणे, शेंडे सुकणे आणि झाडे कोमेजणे अशी लक्षणे मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत.

सकाळच्या वेळी पडणारे गार दव आणि सततचे थंड वारे केळीच्या जैविक वाढ प्रक्रियेस अडथळा ठरत आहेत. केळी पिकासाठी साधारणतः २५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान आवश्यक असते. मात्र, यंदा अनेक भागांत तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली गेल्याने झाडांची अन्नप्रक्रिया मंदावली आहे.

थंडीपासून संरक्षणासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक व सेंद्रिय खतांचा, तसेच महागड्या औषधांचा वापर केला; मात्र, निसर्गाच्या लहरीपणापुढे सर्व उपाय निष्फळ ठरत असल्याचे चित्र आहे. परिणामी अनेक शेतकरी आता उभ्या बागा काढून टाकण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या बाजारात केळीला ७०० ते १ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळत असून, तो खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. एकरी दीड लाखांहून अधिक खर्च करूनही बाग वाचवणे कठीण झाले आहे. वाढ पूर्णपणे थांबली असून झाडांचे शेंडे सुकत आहेत, अशी व्यथा अशोक पाटील मनसे, केकतनिभोरा, जितेंद्र भिला पाटील, हिवरखेडा बु हेमंत पाटील पळासखेडा विठ्ठल चव्हाण चिचखेडा, हगणे, या सह परीसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. केळी पिकावरील या संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता असून, कृषी विभागाने तातडीने मार्गदर्शन, संरक्षणात्मक उपाययोजना आणि मदत जाहीर करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

अन्यथा लाखो रुपयांचा गुंतवणूक केलेला केळीचा हंगाम पूर्णतः हातातून जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

## भुसावळची मुलुख मैदान तोफ आज धडाडणार

### • अशोक लाडवंजारी यांच्या प्रचारार्थ आज सभा

प्रतिनिधी । जळगाव



राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे प्रभाग क्र. १४ मधील अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी, तडवी नाजमीन मकबुल, सना शेख रियाज, जमिलोद्दीन शेख शारीफुद्दीन शेख यांच्या प्रचारार्थ दि. ९ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता शहीद अब्दुल हमीद चौक येथे भुसावळची मुलुख मैदान तोफ माजी आमदार संतोष चौधरी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगराध्यक्ष एजाज मलिक, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप खोडपे, जामनेरचे नगरसेवक जावेद मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन कल्लु खाटीक, ईसा व्यापारी, मुस्तफा मिर्झा, फिरोज खान, नईम खाटीक, नदीम शेख, रफीक शहा, सलीम काकर, डॉ.रिजवान खाटीक, सुभाष घुगे, अकिल पेंटर्स्, गोपाळ हटकर, अफसर खाटीक, योगेश लाडवंजारी आदींनी केले आहे.

## नाहाटा महाविद्यालयामध्ये विविध नृत्याने वेधले लक्ष

प्रतिनिधी । भुसावळ

येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कलागुण सादरीकरण कार्यक्रम आज घेण्यात आले. फूड स्टॉल व पारंपरिक वेशभूषा कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.बी. एच. बऱ्हाटे यांनी केले.

फूड स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावून रुचकर खाद्यपादार्थांची विक्री केली. पारंपरिक वेशभूषा स्पर्धांमध्ये गुजराती नृत्य, महाराष्ट्रीयन लावणी, राजस्थानी, कोळी, तमीळ नृत्य, बंगाली नृत्य, आदिवासी नृत्य, पंजुली अवतार नृत्य, तळीम नृत्य आदी कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे दर्शनही घडले.

सदर कार्यक्रमास प्राचार्य प्रा. डॉ.बी.एच. बऱ्हाटे, उपप्राचार्य प्रा. डॉ.डी.एन. पाटील, उपप्राचार्य प्रा.डॉ. जी.आर. वाणी, कला मंडळ प्रमुख प्रा. स्मिता बेंडाळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी भारतीयांच्या आसाम, तमिळ, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान या प्रातांतील वेशभूषा परिधान करून नृत्य सादर केले. शाहू महाराज व शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वेशभूषेत शेतकऱ्यांच्या व्यथा, भारतीय संस्कृतीचे महत्त्व, महाविद्यालयीन जीवनावर काही विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. परीक्षक म्हणून डॉ. विद्या पाटील, डॉ. रश्मी शर्मा, डॉ. राजेंद्र नाडेकर डॉ.चंद्रकांत सरोदे होते.

## थोडक्यात

### मागासवर्गीय लोकांना समाजोपयोगी भांड्यांचे वाटप

**कळमसरे ता. अमळनेर ।** ग्रामपंचायत कळमसरे येथील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या मागासवर्गीयांच्या १५% राखीव निधी मधून सन २०२५/२६ या वर्षातील निधीमधून सुमारे ७० ते ७५ हजार रुपये किमतीचे समाजोपयोगी भांडे, खुर्च्या तसेच मंडपचे वाटप सरपंच जगदीश निकम, उपसरपंच पिंटू राजपूत, ग्रामपंचायत सदस्य दिनकर चव्हाण, लताबाई मंगल भील, शशिकांत बडगुजर, ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पाटील तसेच समाजातील किशोर निकम, भागवत निकम, कैलास चव्हाण, आधार सोनवणे, रघुनाथ भिल तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## करंज येथील गंगाई इंग्लिश स्कूलमध्ये बालआनंद मेळावा उत्साहात!

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील करंज येथील गंगाई प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे दि. ७ रोजी बाल आनंदमेळावा हा उपक्रम अत्यंत उत्साहात व जल्लोषात झाला.**



या कार्यक्रमाचे उद्घाटन योगणाबाई पाटील (गाढोदेकर) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी श्री स्वामी समर्थ ग्रुपच्या सचिव ज्योतीमाई मनोजकुमार पाटील, श्री स्वामी समर्थ ग्रुपचे संचालक रामदादा पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका छाया पाटील, शाळेचे प्रशासकीय अधिकारी मधुकर पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक योगराज सपकाळे, युवासेनेचे उपतालुका प्रमुख स्वप्नील सोनवणे तसेच भोकर येथील सचिन पवार, करंज गावातील ज्येष्ठ नागरिक हिलाल पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले विविध पदार्थ, खेळणी व इतर वस्तूंच्या एकूण ९० स्टॉल्सची उभारणी करण्यात आली होती. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री व्यवहार, आर्थिक नियोजन व व्यवहारिक शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने माता-पालक वर्गाची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमास पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व परिसरातील माजी मुख्याध्यापकांनीही आवर्जून उपस्थिती दर्शविली. मनोजकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे मनापासून कौतुक केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या झाला.

## प्रभाग १३ मध्ये महायुतीच्या प्रचाराचा धडाका

### महायुतीचे प्रफुल्ल देवकर यांच्यासह उमेदवारांचे महिलांकडून औक्षण, ज्येष्ठ नागरिकांकडून आशीर्वाद

प्रतिनिधी । जळगाव



**येथील महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १३ मध्ये महायुतीच्या उमेदवारांनी प्रचाराचा मोठा धडाका लावला आहे. यात प्रभाग १३ ड मधील उमेदवार प्रफुल्ल गुलाबराव देवकर यांच्यासह उमेदवारांनी संत गाडगे बाबा चौक आणि मोहन नगर यासह परिसरात काढण्यात आलेल्या प्रचार फेरीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

महायुतीचे उमेदवार प्रफुल्ल देवकर यांच्यासह इतर उमेदवारांनी दौलतनगर, रामनगर, आणि गाडगेबाबा चौक या भागात घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. या दौऱ्यादरम्यान ठिकठिकाणी महिलांकडून उमेदवारांचे औक्षण आणि पुष्पहार अर्पण करून जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे परिसरात विजयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रचार फेरीदरम्यान उमेदवारांनी स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या प्रभागातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधांबाबत असलेल्या प्रश्नांवर चर्चा करून आगामी काळात विकासाचे व्हिजन नागरिकांसमोर मांडले. यावेळी महायुतीचे उमेदवार प्रफुल्ल गुलाबराव देवकर, सुरेखा नितीन तायडे यांच्यासह नितीन सपके, रोहिदास पाटील, मधुकर पाटील, दीपक भोसले, ललित देशमुख, अतुल जाधव, अमोल पाटील, रवि पाटील, धवल पाटील, तन्मय चौधरी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करीत संपूर्ण प्रभाग दणाणून गेला होता.

## जिल्ह्यात ठिकठिकाणी सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी






प्रतिनिधी । जळगाव चमू

**जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालये शैक्षणिक संस्था तसेच इतर ठिकाणी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.**

**सावता माळी समाज सुधारणा मंडळ**

**धरणगाव ।** क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी अबलांना सबला करुन मुख्यप्रवाहात आणले. त्यांचे ऋण आपण विसरु नये, असे प्रतिपादन लोकनियुक्त नगराध्यक्षा लिलाताई चौधरी यांनी केले. येथील सावता माळी समाज सुधारणा मंडळ, मोठा माळीवाडा व समस्त माळी समाज पंच मंडळ, लहान माळीवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंतीच्या उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. धरणी चौक येथील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ सावित्रीमाई यांच्या प्रतिमेचे पूजन धरणगाव नगर परिषदेच्या नवनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी यांच्याहस्ते करण्यात आले. डॉ. देवश्री महाजन यांनी मनोगतातून त्यांचा कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी नवनियुक्त सर्व नगरसेवकांचा तसेच शिक्षिका, क्रीडापटूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कविता महाजन यांनी केले तर आभार समाजाचे अध्यक्ष व्ही. टी. माळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कैलास महाजन, कांतीलाल महाजन, विनायक महाजन यांनी मेहनत घेतली.

**जि.प.शाळेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा**

**अमळनेर ।** जि.प.शाळेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टाकरखेडे येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी आणि धनदाई माता एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय या ठिकाणी देखील सावित्री माता फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी हायस्कूलचे मुख्याध्यापक मनोज पाटील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच रामभाऊ भील तसेच उपसरपंच, सदस्य व कर्मचारी, अंगणवाडी सेविका मदतनीस उपस्थित होते. जि.प.मराठी शाळेच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक भीमराव वरोळे होते. उपशिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्ण स्मरण करून स्त्री-शिक्षण, सामाजिक न्याय आणि समानतेचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. त्यांच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित विचार व माहितीचे सादरीकरण करण्यात आले. याच कार्यक्रमाच्या निमित्तानेसावित्रीबाई अ आ गम अगी सानि गमभ फुले दत्तक योजनेअंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन उमेद आणि आत्मविश्वास निर्माण झाला. लाभार्थी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. विद्यार्थ्यांनी भाषणात सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रस्तुत केले, विद्यार्थीनीनी सावित्रीबाईची वेशभूषा करून कार्यक्रम अधिक देखणा केला.



**युनिव्हर्सल इंटरनॅशनल स्कूल**

**पारोळा । प्रतिनिधी** सावित्रीबाई फुले यांची १९५ जयंतीनिमित्त आज युनिव्हर्सल इंटरनॅशनल स्कूल पारोळा येथे सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमापूजन व सरस्वती मातेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानिमित्ताने शाळेत विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले त्यात निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा पथनाट्य घेण्यात आले. इयत्ता तिसरी कक्षेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास या विषयावर सुंदर असे पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित पाटील सर यांनी केले व शाळेतील लहान मुले देखील सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत येऊन त्यांनी स्वतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले व छानसा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेच्या प्राचार्य गायत्री जी गुजराती मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रोहिणी पाटील, शुभांगी पाटील, खुशी दाणेज मोना खत्री, धनंजय पाटील सर, मोनाली कासार, वैशाली पाटील, कांचन पाटील, माधुरी पाठक, उज्वला पाटील या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

## धनाजी नाना विद्यालयात करिअर मार्गदर्शन, समुपदेशन कार्यक्रम

प्रतिनिधी । खिरोदा, ता. रावेर

खिरोदा (ता. रावेर) येथे धनाजी नाना विद्यालयात दि. ५ जानेवारी सोमवार रोजी करिअर मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी आरती सारंग चौधरी, मॅनेजिंग डायरेक्टर, सक्षम कौन्सलिंग सेंटर, भुसावळ या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक भवितव्याबाबत योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या सोबत क्षमा फेगडे उपस्थित होत्या. सुरुवातीला मुख्याध्यापिका सौ मनीषा महाजन यांनी मान्यवरांचे स्वागत केले. पाहुण्यांच्या परिचय मनिषा पाटील यांनी केला समुपदेशन आरती चौधरी यांनी केले. यावेळी आरती चौधरी यांनी विविध करिअर संधी, विद्यार्थ्यांच्या आवडी क्षमता ओळखणे, योग्य निर्णय कसे घ्यावेत तसेच मानसिक तणावावर मात कशी करावी सोशल मिडीयाचा जपून वापर करा, भावनांवर नियंत्रण ठेवा, आकर्षण व प्रेम यातील फरक ओळखा याबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## अनोरे येथे बालगोपालांचा फुलोत्सव

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील अनोरे येथील बळीराम जीवन महाजन विद्यालयात इयत्ता पाचवी ते आठवीच्या लहान बालगोपाल मुलांनी पुलोत्सव हा सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला.**

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अनोरे विद्यालयात फुलोउत्सव हा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आर.बी. महाले यांनी केले. यावेळी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी मराठी गाणी, हिंदी गाणी, लोकगीते, एकपात्री नाटय, नाटिका सादर केली. मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन या कार्यक्रमाचे उद्घाटन अस्तित्व फाउंडेशन मुंबईचे अध्यक्ष मिलिंद पाटील यांनी केले तर प्रमुख पाहुणे धानोरे येथील सरपंच भगवान महाजन अनोरेचे सरपंच स्वप्निल महाजन, गारखेडाचे सरपंच भास्कर पाटील, माजी मुख्याध्यापक एम. एच. चौधरी होते. संस्थेचे उपाध्यक्ष मधुकर देशमुख, सचिव काशिनाथ मिस्त्री, संचालक कैलास पाटील, नामदेव महाजन, जगन्नाथ महाजन, डॉ. राजाराम महाजन आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक आर. बी. महाले, ए. के. पाटील, बी. आर. महाजन, एच. आर. महाजन, के. आर. महाजन, डी. पी. महाजन यांनी सहकार्य केले.